


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३५४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.०४ ऑगस्ट २०२५

## बल्लारपुरात स्मार्ट मिटरला काँग्रेसचा विरोध शहर काँग्रेसचे विज वितरणला निवेदन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, बल्लारपूर (चंद्रपूर) :** घरगुती वीज ग्राहकांना जुन्या मिटरनुसार वीज देयक दिल्या जात आहे. मात्र वीज वितरण कंपनीमार्फत स्मार्ट मिटर लावण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. यामुळे वीज ग्राहकांना दुप्पट देयक येण्याची धास्ती आहे. बल्लारपूर शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी स्मार्ट मिटर लावण्याला विरोध केला आहे. याबाबत शुक्रवार (दि.१) ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता अरविंद कातकर यांना निवेदन सादर करुन संताप व्यक्त केला. बल्लारपूर शहरात मागील काही दिवसापासून विज ग्राहकांचे जुने मिटर काढले जात आहे. त्याठिकाणी स्मार्ट मिटर लावले जात आहे. जुने मिटर योग्य असताना स्मार्ट लावण्याची काय गरज आहे. यामुळे वीज ग्राहकांत संताप व्यक्त केला जात आहे. स्मार्ट मिटर लावण्याची प्रक्रिया काही ठिकाणी सुरु केली. त्या वीज ग्राहकांना देयक दुप्पट होत आहे. याचा फटका वीज ग्राहकांना बसत आहे. स्मार्ट मिटर लावण्याची प्रक्रिया सुरु करणारे कंत्राटदार वीज ग्राहकांवर दडपण आणत आहे. ही वीज ग्राहकांवर जबरदस्ती आहे. वीज वितरण कंपनीने हा प्रकार त्वरित थांबवावा, असे निवेदन बल्लारपूर शहर काँग्रेस पक्षाच्या वतीने विज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता अरविंद कातकर यांना सादर करून स्मार्ट मिटर लावण्याची प्रक्रिया बंद करावी,असे म्हटले आहे.

निवेदन सादर करणाऱ्या शिष्टमंडळात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव घनश्याम मुलचंदानी, शहर अध्यक्ष देवेंद्र आर्य, माजी अध्यक्ष अब्दुल करीम, भास्कर माकोडे, डॉ. सुनील कुल्दीवार, नरेश मुदंडा, सुनंदा आत्राम, नरसिंह रेब्बावार, प्राणेश अमराज, मेहमुद पठाण, कासिम शेख, मंगेश बावणे, नरेश आनंद, नरेश बुरांडे आदी पदाधिकाऱ्यांचा समावेश होता.

## मिरा भाईंदर शहर मनसेचा इंदिरा गांधी हॉस्पीटलवर हल्लाबोल




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा भाईंदर :** सरकारी डॉक्टरांच्या मनमानीमुळे गरीब रुग्ण उपचारापासून वंचित... दिनांक २.०८.२०२५ रोजी मनसेने प्रशासनास जाब विचारला. भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे नियमित डॉक्टर गैरहजर, डॉक्टरांची कमतरता असल्याकारणाने रुग्णांवर उपचार होत नाहीत. उपस्थित सिस्टर यांनी वारंवार तक्रार करून देखील डॉक्टर यांची कमतरता वैद्यकीय आरोग्य विभाग डॉक्टरांची पूर्तता करण्यात अपयशी. भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेना शिष्ट मंडळ यांनी भेट देताच रुग्णांची परिस्थिती गंभीर असल्याबाबत माहिती पडले. सोमवारी डॉक्टर रुजून झाल्यास वैद्यकीय आरोग्य विभागाच्या कार्यालयाला घेराव घालून जाब विचारला जाईल सदर भेट करतेवेळी उपजिल्हाध्यक्ष हेमंत सावंत, शहर संघटक शशी मेंडन, शहर सचिव हरेष सुतार, माथाडी कामगार उपाध्यक्ष सेना चंद्रशेखर जाधव, सरचिटणीस रमाकांत माळी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## माझ्या गर्लफ्रेंडपासून लांब रहा, प्रेमप्रकरणाला भयानक वळण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, बुलडाणा :** बुलडाणा शहरात १ ऑगस्ट रोजी प्रेम प्रकरण असल्याच्या संशयावरून सनी जाधव याचा खून करून आरोपी फरार झाले होते. त्यामुळे संपूर्ण गृहविभाग हे तातडीने अॅक्शन मोडवर आले होते. याप्रकरणी अवघ्या काही तासांतच पोलिसांनी चार आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत. आरोपींना काल (२ ऑगस्ट) रोजी न्यायालयात हजर केले असता. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस तपासानुसार प्रेम प्रकरणातून सनी सुरेश जाधव या १९ वर्षे युवकाचा खून झाल्याची माहिती समोर आली आहे. एकाच मुलीवर दोघांच्या प्रेम प्रकरणातून सदर प्रकार घडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. १ ऑगस्टच्या सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास शहरातील ड्रीम कॉस्मेटिक दुकानाच्या बाजूला एका इमारतीच्या ठिकाणी, सनी जाधववर देवराज माळी सह इतर चार ते पाच जणांनी चाकूने हल्ला चढवला. त्याचा निर्घृणपणे खून केला. या खून प्रकरणात देवराज संतोष माळी (राहणार भीलवाडा) याच्यासह इतर आरोपींना शहर पोलिसांनी काही तासांतच अटक केली.

न्यायालयाने चारही आरोपींना ५ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सनी जाधव खून प्रकरणात फक्त चार आरोपी नसून मारहाण करणाऱ्यांमध्ये आणखी नावे समाविष्ट होण्याची व आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. शनिवारी २ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजताच्या सुमारास सनी जाधव याच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. रवी राठोड, सपोनि भरत चापाईतकर, प्रताप भोस, जयसिंग राजपूत, डी. बी. प्रमुख पोउपनि रवी मोरे, हेड कॉन्सटेबल संदीप कायंदे, संतोष वाघ, मपोकॉ. सुनीता खंडारे, पोकॉ. युवराज शिंदे, मनोज सोनुने, विशाल बनकर, दीपक चव्हाण, तांत्रिक विश्लेषक हेड कॉन्सटेबल राजू आडवे, पोका कैलास ठोंबरे, ऋषिकेश खंडेराव, हेड कॉन्सटेबल पंजाबराव साखरे, सुनील जाधव यांनी सहभाग घेतला होता.

# कुणालाही भाषेच्या आधारावर मारलं तर कारवाई करणारच

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा इशारा दिला आहे. ते एका मुलाखतीत बोलत होते. हे चुकीचं आहे. कुणालाही भाषेच्या आधारावर मारणं योग्य नाही. महाराष्ट्रात तुम्ही राहतात म्हणून तुम्हाला मराठी आली पाहिजे हा आग्रह ठिक आहे. पण हा दुराग्रह होता कामा नये. तुम्ही कुणी मराठी बोलत नाही यासाठी कुणाला मारु शकत नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. यावेळी त्यांनी मंत्री नितेश राणे यांचं वक्तव्यदेखील चुकीचं असल्याचं म्हटलं.

नितेश राणे जे बोलले ते चुकीचं आहे. त्यांना खरंतर वेगळं बोलायचं होतं. त्यांचं म्हणणं होतं की, तुम्ही मराठी येत नाही म्हणून हिंदूंना मारत आहेत. इतर लोकं देखील आहेत ज्यांना मराठी बोलत नाहीत त्यांना का मारत नाहीत? नितेश राणे जे बोलले ते एकप्रकारे बरोबर आहे आणि दुसरीकडे चुकीचं देखील आहे. केवळ भाषेच्या आधारावर किंवा कोणत्या धर्माची लोकं ही भाषा बोलत नाहीत या आधारावर हे डिस्क्रिमिनेट होऊ शकत नाही. हे चुकीचं आहे. त्यामुळे अशा भाषेचा वापर व्हायला नको, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मराठी बोलता येत नाही म्हणून मारहाण झाल्याच्या दोन-तीन घटना निश्चित झाल्या आहेत. जो घटना करणार त्याच्यावर आमचं सरकार कारवाई करणार. मी आधी हे सांगतो की, महाराष्ट्रात मराठी शिकण्याची सक्ती आहे. आम्ही ती सक्तीची केली आहे. त्याबाबत आमचं कोणतंही कॉम्प्रमाईज नाही.

महाराष्ट्रात मराठी बोलली गेली पाहिजे असा आग्रह करणं चुकीचं नाही. पण कुणी मराठी बोलू शकत नाही तर त्याला तुम्ही मारणार हे आमच्या सरकारला मंजूर नाही. असं जो करणार त्यावर आम्ही कारवाई करणार म्हणजे करणार, असं देवेंद्र फडणवीस स्पष्ट म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांच्या या वक्तव्यावर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे. आगामी काळात मुंबई महापालिकेच्या निवडणुका आहेत. त्यामुळे राज ठाकरे आणि भाजप यांच्यातील शाब्दिक संघर्ष वाढतो का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# जल्लोष स्वच्छतेची विजयी रॅली मोठ्या उत्साहात



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०३, मिरा भाईंदर :** केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण सन २०२४-२५ मध्ये देशातील ३ ते १० लाख लोकसंख्येच्या शहरात मिरा भाईंदर शहराने प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला. याचे औचित्य साधून, शनिवार, दिनांक २ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता मॅक्सस मॉल ते मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालय या मार्गावर 'जल्लोष स्वच्छतेचा विजयी मिरवणूक' काढण्यात आली. या मिरवणूकीच्या पूर्वी उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांनी प्रास्ताविक सादर केले. त्यानंतर मिरा भाईंदर शहराचे मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी सर्व सफाई कर्मचा-यांचे आभार व्यक्त केले व या

राष्ट्रीय पुरस्कारानिमित्त अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. स्वच्छतेच्या कामात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिला सफाई कर्मचारी व पुरूष सफाई कर्मचा-यांचे प्रतिनिधी म्हणून पाच महिला व पाच पूरूष सफाई कर्मचा-यांना व्यासपीठावर बोलवून मा. आमदार व आयुक्त तथा प्रशासक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा राष्ट्रपती पुरस्कार सफाई कर्मचा-यांना व शहरातील नागरीकांना समर्पित केल्याचे आयुक्तांनी सांगून सफाई कर्मचा-यांच्या कामाचायथोचित सन्मान व सत्कार केला. यानंतर मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा यांनी उपस्थितांना संबोधित केले. या संबोधनात अधिकारी, कर्मचारी व विशेषत: सर्व सफाई कर्मचा-यांचे आभार व्यक्त केले. त्याच बरोबर हा मान टिकवून ठेवण्यासाठी शहरातील सर्व नागरिकांनी जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. यासाठी माझे शहर, माझा अभिमान या भावनेने सर्व नागरिकांनी शहरात स्वच्छता राहील याची विशेष काळजी घेतली पाहिजे. तसेच हा प्रथम क्रमांक कायम टिकवून ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महापालिका सतत प्रयत्नशील राहील असे सांगितले. या विजयी मिरवणूकीत मिरा भाईंदर महापालिकेचे सफाई कर्मचा-यांबरोबरच शहरातील नागरीकांनीदेखील मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मिरवणुकीच्या मार्गावर विविध ठिकाणी महिलांनी मा. आयुक्तांसह इतर अधिका-यांचे औक्षण करून अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. तसेच नागरीकांनी पुष्पवृष्टी करून त्यांच्या कार्याचा सन्मान केला. या विजयी मिरवणूकीच्या मार्गावर पुष्पवृष्टीने झालेली अस्वच्छता त्वरीत स्वच्छ करण्यात आली. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वात संपन्न झालेल्या विजयी मिरवणूकीत मिरा भाईंदर शहराचे आमदार नरेंद्र मेहता, मिरा भाईंदर पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण (भा.पो.से.), माजी उपमहापौर हसमुख गेहलोत, माजी सभापती सूरेश खंडेलवाल, माजी सभापती ध्रुवकिशोर पाटील, माजी सभापती डॉ. सुशील अग्रवाल, अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त प्रियांका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मु.) कल्पिता पिंपळे, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता शरद नानेगांवकर, सिस्टम मॅनेजर तथा जनसंपर्क अधिकारी राजकुमार घरत, सहा. आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) योगेश गुनिजन, माजी नगरसेवक, इतर मनपा अधिकारी व पोलिस अधिकारी/कर्मचारी,वाहतुक पोलिस अधिकारी/कर्मचारी, अग्निशामक अधिकारी/कर्मचारी विशेषत: सफाई कर्मचा-यांनी व नागरिकांनी मोठ्या आनंदाने व उत्साहाने सहभाग घेतला. 'जल्लोष स्वच्छतेचा विजयी मिरवणूक' मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाली.

# महाराष्ट्राला नख लावणाऱ्यांना अंगावर घेऊ; राज ठाकरेंचा राज्य सरकारला इशारा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, पनवेल :** महाराष्ट्रातील मुलांना हिंदी कशी येईल, याचा विचार आमचे मुख्यमंत्री करतात, परंतु बाहेरून महाराष्ट्रात येणाऱ्यांना मराठी यावी यासाठी मात्र ते प्रयत्न करीत नाहीत', असा टोला मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी शनिवारी लगावला.

पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त शेकापने पनवेलमधील कार्यक्रमाला महाविकास आघाडीच्या नेत्यांसह मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाही निमंत्रित केले होते. या कार्यक्रमास शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आदी उपस्थित होते. आपल्या भाषणात ठाकरे यांनी पंतप्रधानांसह मुख्यमंत्र्यांवरही टीका केली. भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी शेकापचे कौतुक केले. शिवसेनेच्या पहिल्या अधिवेशनाची त्यांनी आठवण करून दिली. 'भगव्या व्यासपीठावर प्रथमच कॉम्रेड श्रीपाद डांगे यांच्या रूपाने लाल ध्वज फडकत होता. आज लाल ध्वजासह दोन भगवे ध्वज उपस्थित आहेत. त्यावेळचे राजकारण आणि राजकारणी मोठ्या मनाचे होते. आता तसे राहिले नाही', अशी टिप्पणी राज यांनी केली.

'देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री गुजराती आहेत. महाराष्ट्रातील अनेक प्रकल्प गुजरातला नेण्यात आले. गृहमंत्री एका मुलाखतीत सांगतात, मी हिंदी भाषिक नाही, मी गुजराती आहे. मात्र, आम्ही भाषेविषयी, राज्याविषयी बोललो तर संकुचित ठरतो. गुजरातमध्ये हिंदी भाषेची सक्ती नाही. मग महाराष्ट्रातच हिंदी कशासाठी', असा सवाल त्यांनी केला. 'महाराष्ट्रात गुजराती साहित्य संमेलन भरविले जाणार आहे. खुशाल भरवा. यावर शिवसेना व मनसे काहीतरी बोलतील, असे त्यांना वाटत होते. परंतु लक्षात ठेवा, तुम्हाला जे वाटते ते आम्ही मुळीच बोलणार नाही. पण आम्हाला जे वाटते तेच आम्ही बोलू. गुजरातचे नागरिक नसलेल्या नागरिकांना शेतजमीन घेता येत नाही. रिझर्व्ह बँकेची विशेष परवानगी घ्यावी लागते', याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

'नव्या कायद्याप्रमाणे एखाद्या प्रकल्पाविरोधात बोलल्यास शहरी नक्षली ठरवणार असाल, तर अटक करूनच दाखवा', असे आव्हानही ठाकरे यांनी दिले. 'मराठी माणसाच्या थडग्यावर उद्योग उभे राहणार नाहीत. मराठी माणसाचा मानसन्मान राखून उद्योग आणावे लागतील. छत्रपतींच्या राजधानीत डान्सबार सुरू आहेत, यापेक्षा शरमेची गोष्ट काय? बंद झालेले डान्सबार सुरू कसे', असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. 'गुजरातमध्ये २० हजार बिहारींना हाकलून देणारे अल्पेश ठाकूर भाजपात प्रवेश करतात व त्यांचा सत्कार केला जातो आणि राज ठाकरेला देशद्रोही म्हटले जाते. स्वत:च्या राज्याची काळजी घेणारे हे लोक दुसऱ्या राज्यात मात्र गोंधळ घालायला येत आहेत', अशी मल्लिनाथीही राज यांनी केली.

# तात्काळ रस्ते दुरुस्तीची कार्यवाही करण्याचे प्रशासनाला निर्देश

## बल्लारपूर-कोठारी, चंद्रपूर-मुल रस्त्याची आ.मुनगंटीवार यांनी केली पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** सर्वसामान्य नागरिकांना उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी कायम आग्रही असलेले राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी खड्डेमुक्त रस्त्यांसाठी पुढाकार घेतला आहे. तातडीने रस्ते दुरुस्ती करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहे. यातून जनहिताच्या कामांमधील त्यांची तत्परता पुन्हा एकदा बघायला मिळत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर-बामणी-कोठारी, चंद्रपूर-मुल आणि चंद्रपूर-जाम या प्रमुख मार्गांवरील खड्डे आणि उखडलेले रस्ते, ही गंभीर समस्या बनली आहे. रस्त्यावरील खड्डे म्हणजे थेट मृत्यूचे निमंत्रण ठरत आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही स्थिती अत्यंत चिंताजनक असून संबंधित विभागांना तात्काळ रस्ते दुरुस्तीची कार्यवाही करण्याचे निर्देश आ.सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत दिले. बल्लारपूर-बामणी-कोठारी आणि चंद्रपूर-मुल या दोन्ही रस्त्यांच्या डागडुजी संदर्भात बल्लारपूर येथील शासकीय विश्रामगृहात आ.मुनगंटीवार यांनी आढावा बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. यावेळी वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार रेणुका कोकाटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अशोक गाडेगोणे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, भाजपा नेते रामपाल सिंग, चंदू मारगोनवार, अक्षय पगारे, उपअभियंता संजोग मेंढे, राज्य महामार्ग विभागाचे उपअभियंता बोबडे, उपविभागीय अभियंता अंबुले, चव्हाण, राठोड आदींची उपस्थिती होती.

'रस्त्याच्या डागडुजी संदर्भात संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी. रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करून तीन दिवसांत निविदा प्रक्रिया सुरू करण्यात यावी. पावसाचा खंड पडताच रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात यावे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी खड्डे बुजवण्याचा कार्यक्रम प्रभावीपणे राबवावी.

खड्ड्यांमुळे अपघातात अनेक निष्पाप नागरिकांचा बळी गेलेला असून, अशा घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी रस्ते अपघाताच्या बाबतीत कायदा प्रस्थापित करणे आवश्यक आहे. रस्ता उखडलेला असेल किंवा मोठे खड्डे पडले असतील, तर अशा ठिकाणी १०० फुटांपर्यंतचा रस्ता खोदून त्याचे रेडियम पट्ट्यासह संपूर्ण नूतनीकरण करण्यात यावे,' असे निर्देश आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या बैठकीत दिले. त्यासोबतच बीओटी मार्गांवर खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातात एखाद्याचा मृत्यू झाला, तर अपघातग्रस्त कुटुंबाला ५० लाखांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी शासनाकडे करणार असल्याचेही आ. मुनगंटीवार म्हणाले. 'बामणी येथे सर्व्हिस रोड देण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करण्यात यावी. कोठारीकडे जाणारा रस्ता आणि कोठारी पुलाचे काम तात्काळ हाती घेण्यात यावे. सर्व रस्त्यांचा 'रफनेस इंडेक्स' तपासून तो निर्धारित मानकांनुसार आहे की नाही, हे निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच, मुल रस्त्यावरील अपघातांने किती मृत्यू झाले आहेत, याबाबतची माहिती पोलीस अधीक्षकांकडून घेण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



### आ.मुनगंटीवार यांच्याकडून बल्लारपूर-कोठारी आणि चंद्रपूर-मुल रस्त्याची पाहणी

आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी बल्लारपूर-कोठारी आणि चंद्रपूर-मुल रस्त्याची पाहणी केली तसेच संबंधित विभागाला तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या. ज्या दर्जेदार रस्ते तयार होणे अपेक्षित आहे. त्या दर्जाचे काम कंत्राटदारांकडून होताना दिसत नाही, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. प्रत्येक प्रकल्पासाठी दिला जाणारा 'डिफेक्ट लायबिलिटी पिरियड' (डीएलपी)) हा ५ वर्षांचा असून, त्या कालावधीत संबंधित रस्त्याचा 'रफनेस इंडेक्स' मोटरेबल ठेवणे बंधनकारक आहे. खड्डा लहान असतानाच त्याची तात्काळ दुरुस्ती करावी. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती होणे आवश्यक असून, गरज असल्यास त्यावर कार्पेटिंग करावे. मोठ्या प्रमाणात खड्डे असलेल्या व उखडलेल्या रस्त्यांच्या नूतनीकरणाचे काम कंत्राटदाराकडून तातडीने करून घेण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश आ.मुनगंटीवार यांनी संबंधित विभागाला यावेळी दिले.

# थोडक्यात

## शेतक-यांना शेती पंपासाठी वीज कनेक्शन द्यावीत - विकास हादवे



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०३, सातारा :** राज्यातील नदीकाठच्या गावांतील शेतक-यांना सोलर पंप बसविणे अडचणीचे आणि खर्चिक आहे, तरी सोलर सिस्टिम बंद करून त्याऐवजी पंपासाठी वीज कनेक्शन देण्यात यावीत. अशी मागणी शिवसेना प्रणित शेतकरी सेनेचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष विकास हादवे यांनी राज्याचे कृषीमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकरी संवाद यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्र भर दौरा करून शेतक-यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी शेती पंप बाबत आपल्या व्यथा मांडल्या. १ नोव्हेंबर पासून शासनाकडून नवीन वीज कनेक्शन जोडणी बंद करून सोलर पॅनल साठी विज वितरण कंपनीकडून सक्ती केली जात आहे. मात्र ही सक्ती म्हणजेच अगोदरच वन्यप्राणी, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणी असलेल्या शेतक-यांना त्रासदायक ठरत आहे. त्यातच राज्यभर पावसाने थैमान घातल्याने शेतकरी चिंताग्रस्त असताना या सक्तीने अर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे. नदीकाठी वन प्राण्यांचा नेहमी वावर असतो. याबाबतच्या अनेक तक्रारी आमच्या कडे आल्या आहेत. सोलर पॅनलसाठी नदीकाठी एक गुंठा जागा खरेदी करावी लागत आहे, काही ठिकाणी शेती पंप पासून जास्त अंतरावर असल्याने पाणी खेचत नाही, पावसाळ्यात पंप काढुन ठेवावे लागत आहे. व पावसाळ्या नंतर पुन्हा जोडणी करावी लागत आहे. यामुळे शेतक-यांना अडचणीचे व त्रासदायक ठरत आहे. यामुळे अगोदरच आर्थिक संकटात अडकलेल्या शेतक-यांना यामुळे मोठा भुर्दंड सोसावा लागत आहे. तरी याबाबत आपण स्वतः लक्ष घालून नदीकाठच्या गावांतील शैतक-यांवर सोलर पंपची योजना बंद करून पुर्वी प्रमाणे शेती पंपासाठी नियमित वीज कनेक्शन द्यावीत. अशी मागणी विकास हादवे यांनी केली आहे.

## छत्तीसगड व आसामचे महामहीम राज्यपालांच्या हस्ते डॉ.निलेश राणे यांचा होणार सन्मान



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, नाशिक :** अवॉर्ड ऑफ इंडिया या संस्थेच्या वतीने अटल भारत गौरव सन्मान सोहळ्याचे आयोजन गुवाहाटी (आसाम) येथे होणार असून या राष्ट्रीय पुरस्कारासाठी देश विदेशातील पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. या भव्यदिव्य पुरस्कार सोहळ्यासाठी डॉ.निलेश राणे यांना विशेष अतिथीचा मान मिळाला असून त्यांना छत्तीसगड व आसामचे महामहीम राज्यपालांच्या हस्ते विशेष सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. त्यावेळी आसाम राज्यातील काही मंत्री महोदय उपस्थित राहणार आहेत, असे अधिकृत पत्र डॉ.निलेश राणे यांना दिल्ली येथून प्राप्त झाले आहे. ही अतिशय महाराष्ट्रासाठी गौरवाची व कौतुकास्पद बाब आहे, एवढ्या कमी वयात डॉ.निलेश राणे यांनी सामाजिक, न्याय, क्रीडा, सांस्कृतिक, कृषी व आरोग्य क्षेत्रात आपले कार्य राज्यात नाहीतर देशात सुरू ठेवले आहे, आणि त्यांच्या कार्याची दखल विदेशात सुद्धा घेण्यात आली आहे, असा एक आदर्श त्यांनी युवकांसमोर ठेवला आहे. म्हणून डॉ.निलेश राणे यांच्या संपूर्ण कार्याची दखल अवॉर्ड ऑफ इंडिया या संस्थेने घेतली आहे. तसेच त्यांच्या या सन्मानाबद्दल राज्यातील अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# गव्हर्नमेंट कॉलनीच्या राजाचा पाटपूजन सोहळा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नवी मुंबई :** गणेशोत्सव अवघ्या काहीं दिवसावर येऊन ठेपला असून, सर्वत्र गणेशभक्तांच्या मनात उत्सवाची चाहूल लागली आहे. मुंबईसह नवी मुंबईत ठिकठिकाणी बाप्पाच्या आगमनाची जय्यत तयारी सुरु झाली असून सीबीडी बेलापूर येथील सुखः कर्ता आणि दुःख हर्ता अशी ख्याती असलेल्या शासकीय वसाहतीमधील 'गव्हर्नमेंट कॉलनी'च्या राजाचा पाटपूजन सोहळा दिनांक ०२ ऑगस्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या मंडळाचे यंदा ४२वे वर्ष आहे. या भक्तिमय सोहळ्यासाठी बेलापूर विधानसभा आमदार मंदाताई म्हात्रे उपस्थित होत्या.

यंदा २७ ऑगस्ट रोजी गणेश चतुर्थी साजरी होणार असून नवी मुंबईत अनेक ठिकाणी गणरायाचे पाटपूजन सोहळा उत्साहात पार पडला. विशेष म्हणजे यंदा क्लासिक मित्र मंडळाच्या संकल्पनेतून 'रुजवू मराठी, फुलवू मराठी' या शीर्षकाखाली 'गव्हर्नमेंट कॉलनी'च्या




राजाचा पाटपूजन सोहळा पारंपरिक पद्धतीने पूजा अर्चा करून बाप्पाचा जयघोष करीत नवी मुंबईतील प्रसिद्ध 'चांगभलं' ढोल-ताशा पथकाने आपल्या सादरीकरणाने अवघा परिसर दुमदुमून गेला होता.

त्यामुळे या सोहळ्याला खऱ्या अर्थी भक्तीरसाचा रंग चढला होता. यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. दरम्यान, मराठी भाषा ही भारतातील एक जुनी भाषा असून ती ज्ञानेश्वरीसारखा महातत्त्वज्ञानाचा ग्रंथ लिहून त्यांनी मराठी भाषेचा व संस्कृतीचा पाया घातला. संत साहित्यामुळेच मराठी टिकली. ती भविष्यातही टिकवायला हवी. जर भाषा असेल, तर तुमची संस्कृती टिकेल. तुमची संस्कृती टिकली, तर तुम्हाला सामाजिक, राजकीय ओळख प्राप्त होईल.

हा संदेश या सोहळ्याच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न असल्याचं मत क्लासिक मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश भवार यांनी व्यक्त सांगितले. या सोहळ्याप्रसंगी बेलापूर विधानसभा आमदार मंदा म्हात्रे, स्थायी समिती सभापती डॉ.जयाजीनाथ, शेगडी ट्राफिक पोलिसचे पोलीस निरीक्षक नाथ लोखंडे, क्लासिक मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश भवार, वैभव रापशे, राजेश आडागळे, प्रमोद हाटे, जयदेव ठाकूर, किशोर पाटील, पंकज कदम, सुशील देसाई, संदीप कोळी, बाबू चव्हाण, निलेश कदम, संतोष कांबळे, सौरभ तायडे, प्रसन्ना पाटील, राम मेस्त्री त्यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महसुल सप्ताहनिमित्त मुर्टी येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : शरद भगत**

**दि.०३, मुर्टी (बारामती) :** महसुल सप्ताह निमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संपुर्ण महाराष्ट्र राज्यात महसुल सप्ताह साजरा करण्यात येत असून विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मुर्टी येथील ओढा खोलीकरण झालेल्या मुर्टी ते मोराळवाडी रस्त्या लगतच्या ओढ्या वर मान्यवरांच्या हस्ते लावण्यात आले. या कार्यक्रमासाठी बारामती तहसिलदार गणेश शिंदे, मोरगाव मंडल अधिकारी प्रमिला लोखंडे, मुर्टी गावचे ग्राम महसुल अधिकारी सचिन आहिरे, सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक दिपक वारुळे,पोलीस कॉन्टेबल सागर वारुळे, मुर्टी ग्रामसेविका रोहीणी पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा गट) तालुका अध्यक्ष राजवर्धन शिंदे, पुणे जिल्हा बँकेचे संचालक संभाजीनाना होळकर, लालासाहेब नलवडे, मुर्टी गावचे उपसरपंचकिरण जगदाळे, सामाजिक कार्यकर्ते तानाजी बापु राजपुरे, दिपक जगदाळे व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाने ओढा खोलीकरणकडे विशेष प्राधान्य दिल्याने मुर्टी गावातील वाडीवस्त्यावरच्या ओढ्याची खोली करण झाले. या ओढ्याचे खोलीकरण व दुतर्फी पाणंद रस्ता देखील पहायला मिळतो.

# बँकेसमोरील पुरातन विहीर बुजवण्याच्या विरोधात ४ दिवसांपासून आमरण उपोषण




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०३, अंबाजोगाई (बीड) :** शहरातील महाराष्ट्र बँके शेजारी जुनी पुरातन विहीर अनेक वर्षापासून होती. ही विहीर नगर परिषदेने बुजवुन त्याठिकाणी अनाधिकृतपणे गाळे बांधकाम करुन ते भाडेतत्वावर दिलेले आहेत.

सदरील जागेवरील अतिक्रमण काढून विहीर मोकळी करुन विहीर पुर्वरत सुरु करावी. या मागणीसाठी नगरपालिके समोर लोक जनशक्ती पार्टीच्या कार्यकर्त्यांना उपोषण सुरू केले आहे. या उपोषणास खासदार बजरंग सोनवणे यांनी रविवार, दिनांक ०३ ऑगस्ट २०२५ रोजी भेट दिली. महाराष्ट्र बँकेसमोर असलेली विहीर बुजवून त्याठिकाणी सुरु केलेले गाळे बंद करुन विहीर मोकळी करण्यासाठी नगर पालिकेला निवेदन देण्यात आले होते. तसेच सर्व अंबाजोगाई शहरामध्ये भिक मांगो आंदोलन करण्यात आले होते. परंतु नगर परिषदेने याची दखल न घेता सदर अतिक्रमण अद्यापपर्यंत काढलेले नाही. या विरोधात लोकजनशक्ती पार्टी युवक आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक बन्सी काळे पाटील यांनी मागील ४ दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केले आहे. मागील चार दिवसापासून तोडगा निघाला नसल्याने आमरण उपोषण सुरुच आहे. यावेळी खा. सोनवणे यांच्या बरोबर माजी आ.पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी गटाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाव्हुळे, इस्माईल गवळी, मदनलाल परदेशी, रवी देशमुख, हमीद चौधरी, गणेश घाडगे इत्यादी उपस्थित होते.

### खा.बजरंग सोनवणे यांची उपोषण स्थळी भेट

पुरातन वारसा असलेल्या विहिरीच्या जपणुकीसाठी सुरु असलेला हा लढा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकशाही मार्गाने प्रश्न मांडणाऱ्या प्रत्येकाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहीले पाहिजे. हे ओळखून खा.बजरंग सोनवणे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांची उपोषण स्थळी जाऊन चौकशी केली.

### नगरपालिकेचे लेखी आश्वासन परंतु उपोषण सुरुच

खासदार बजरंग सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट दिल्यानंतर नगरपालिकेच्या वतीने स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी, काळे, पाटील यांना मुख्याधिकरी यांनी दिलेले लेखी पत्र दिले. परंतू दिलेल्या पत्रात विहीरीवरील अतिक्रमण काढणार म्हणून ठोस आश्वासन दिलेले नाही. यामुळे उपोषण मरेपर्यंत सुरु राहील असे उपोषणकर्ते काळे यांनी लेखी दिले आहे.

## दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.०३, मुंबई :** मार्च महिन्यात झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झालेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरळी येथील ग्लोबमील माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांचा जयभवानी प्रिंटर्स या संस्थेतर्फे गुणगौरव करण्यात आला. या गुणगौरव सोहळ्याला जी/दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे उपस्थित होत्या. या गुणगौरव सोहळ्यात उपस्थित दहावी परीक्षेत विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विवेक मंडल (प्रथम क्रमांक) प्रगती रापुसिया द्वितीय क्रमांक आणि शिवांगी चौरसीया तृतीय क्रमांक मिळवलेल्या तिन्ही विद्यार्थ्यांचा संस्थेचे अध्यक्ष नितीन पन्हाळकर आणि त्यांचे सहकारी ऋषिकेश सीळीमकर,विनोद कदम यांनी ट्रॉफी, प्रमाणपत्र वा पुष्पगुछ देऊन गौरव केला.

यावेळी जी /दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आसपासच्या महानगपालिकेच्या शाळेतच प्रवेश घ्यावा आणि आपली प्रगती करावी. असे आवाहन ही केले.

# मोहेकर महाविद्यालयात प्रेमचंद जयंती साजरी

**अक्षराज : राजेश पुरी**

**दि.०२, कळंब (धाराशिव) :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब येथे साहित्य जगातील सर्वोच्च पुरुष, आदर्शवादी



वास्तववादी लेखनाचे मसीहा, लेखणीचे सैनिक मुन्शी प्रेमचंद जी यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हेमंत भगवान, उपप्राचार्य अप्पासाहेब मिटकरी, हिंदी विभाग प्रमुख डॉ. दत्ता साकोळे, मारुती शिंपले, बालाजी बाबर, डॉ.ईश्वर राठोड, डॉ.अर्चना मुखेडकर, डॉ.मीनाक्षी जाधव, प्रा.शाहरुख शेख, शिक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.